




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ



Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784








वर्ष ३ रे    अंक : २२९ वा बुधवार    दि ०५ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर, २ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला मतमोजणी....

वृत्तसंस्था/मुंबई

महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. राज्य निवडणूक आयोगाची आज अतिशय महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेला राज्य निडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे, सचिव सुरेश काकाने, उपसचिव सुर्यकृष्ण मूर्ती, उपायुक्त राजेंद्र पाटील उपस्थित होते. यावेळी आयुक्त दिनेश वाघमारे यांनी राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींचा कार्यक्रम जाहीर केला. या सर्व नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी येत्या २ डिसेंबरला मतदान होणार आहे. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी ३ डिसेंबरला मतमोजनी होणार आहे ङ्कङ्कनगर परिषद आणि नगर पंचायत यांचा प्रत्यक्ष कार्यक्रम जाहीर करत आहोत. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची सुरुवात ही १० नोव्हेंबर २०२५ पासून होईल. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम मुदत ही १७ नोव्हेंबर २०२५ असेल. नामनिर्देशन पत्राची १८ नोव्हेंबर २०२५ ला छाननी होईल. अपील नसलेल्या ठिकाणी नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याची मुदत ही २१ नोव्हेंबर २०२५ असेल. अपील असलेल्या ठिकाणी नामनिर्देशन पत्र माघार घेण्याची अंतिम मुदत २५ नोव्हेंबर २०२५ असेल, अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली. र्वाच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देस दिले आहेत. त्या दृष्टीने आपल्याशी संवाद साधावा आणि आपल्या मार्फत हा संदेश पोहोचवण्यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित केलेली आहे. ही पत्रकार परिषद फक्त नगर परिषद आणि नगर पंचायती संदर्भात आहे. राज्यातील पात्र असलेल्या २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत. यामध्ये एकूण ८६८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड होणार आहे. २४६ नगर परिषदांमध्ये १० नवनिर्वाचित नगरपरिषदांचा समावेश आहे. २३६ नगर परिषदांची मुदत यापूर्वीच संपलेली आहे. राज्यात एकूण १४७ नगरपंचायती आहेत. त्यापैकी ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक होत आहे. त्यामध्ये १५ नवनिर्वाचित आहे. तर २७ नगरपंतायतींची मुदत यापूर्वी संपलेली आहे. उर्वरित १०५ नगरपंतायतींची मुदत समाप्त झालेली नाही. नगर परिषदांची सदस्य संख्या ही २० ते ७५ आहे आणि नगर पंचायतची सदस्य संख्या ही १७ आहे.



नगर परिषदेची निवडणूक ही बहुसदस्य पद्धतीने आहे. साधारण एका प्रभागामध्ये दोन जागा नगर परिषदेमध्ये असतात. पण नगर परिषदेचा सदस्य संख्या विषम असेल तर एका प्रभागात तीन जागा असतात. साधारणत: मतदारांना दोन ते तीन सदस्यांसाठी मतदान करावं लागेल. याशिवाय नगर परिषदेचा एक अध्यक्ष राहील त्याच्यासाठी देखील मतदान करावं लागेल. नगर पंचायतीमध्ये एक सदस्य आणि एक अध्यक्ष असतो. त्यामुळे तिथे मतदारांना २ मते द्यावी लागतील. नामनिर्देशन हे निवडणूक आयोगाने निर्माण केलेल्या संकेतस्थळावर स्वीकारले जातील. एका प्रभागाम्ये एका उमेदवाराला जास्तीत जास्त चार नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील. यासोबत जात वैधता प्रमाणपत्र आवश्यकता आहे. ज्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे त्यांना अर्ज केल्याची पावती जमा करावी लागील. पण असा उमेदवार निवडून आला तर त्याला निवडून आल्यानंतर सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र देणं आवश्यक राहील. नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठी मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. मतदान केंद्र निहाय मतदान याद्या ७ नोव्हेंबरला जाहीर होणार आहे. उमेदवारांसाठी खर्च मर्यादा वाढवण्यात आली आहे. अ वर्ग नगर परिषदेसाठी सदस्य पदासाठी ५ लाख आणि अध्यक्ष पदासाठी १५ लाख, ब वर्गासाठी अध्यक्ष पदासाठी ११ लाख २५ हजार आणि सदस्य पदासाठी ३ लाख ५० हजार, क वर्गासाठी अध्यक्ष पदासाठी ७ लाख ५० हजार आणि सदस्य पदासाठी २ लाख ५० हजार. नगरपंचायतीसाठी अध्यक्ष पदासाठी ६ लाख आणि सदस्य पदासाठी २ लाख २५ हजार अशी खर्चाची मर्यादा आहे. मतदारांसाठी जे संकेतस्थळ विकसित केली आहे त्यामध्ये सर्च फॅसिलिटी दिली आहे. त्यामध्ये मतादारांना त्यांचं नाव आणि मतदान केंद्र शोधता येईल. मतदारांसाठी मोबाईल ॲप तयार केलं आहे. त्यामध्ये तुमच्या उमेदवारांविषयी आणि इतर सर्व माहिती मिळेल.

# चिखलीत ठाणेदार बदलाचा स्फोटक निर्णय! संग्राम पाटील बाहेर भूषण गावंडे मैदानात!

जनसंचलन/ चिखली

चिखलीत कायदा-सुव्यवस्थेवर सातत्याने होणाऱ्या चर्चा आणि वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पोलिस विभागाने धडाकेबाज पाऊल उचलले आहे. ठाणेदार संग्राम पाटील यांची चिखलीहून बदली करून त्यांना थेट बुलढाणा सायबर पोलिस स्टेशनमध्ये पाठविण्यात आले असून, त्यांच्या जागी नवे ठाणेदार भूषण गावंडे आज पदभार स्वीकारणार आहेत.संग्राम पाटील यांच्या कार्यकाळात चिखलीत गुन्हेगारीला मोठ्या प्रमाणावर आळा बसला होता. अवैध धंदे, दहशत माजवणारे गुंड, तसेच वाढत्या चोरी आणि मारामारीच्या घटना त्यांनी कठोर पावले उचलून रोखल्या. स्थानिक नागरिकांमध्ये त्यांची कडक कार्यशैली आणि जलद कारवाईसाठी मोठी दहशत होती. तरीही त्यांच्या अचानक बदलीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.आता नव्या ठाणेदार भूषण गावंडे यांच्यावर नागरिकांच्या सुरक्षेची मोठी जबाबदारी आहे. संग्राम पाटील यांनी उभारलेला शिस्तबद्ध पोलिस कारभार पुढे नेण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असेल. चिखलीत गुन्हेगारी पुन्हा डोके वर काढणार की गावंडे त्यावर अधिक कठोर कारवाई करतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# ...हृदयविकारांचा चढा आलेख...

## संपादकीय लेख

त्याने नेहमीप्रमाणे एक फेरफटका मारण्यासाठी फ ेसबुक उघडले. फिडमध्ये अगदी पहिलीच बातमी बघून त्याला प्रचंड धक्का बसला. त्याचा आता ओडिशामध्ये रहात असलेला जुना सहकारी, वय वर्ष केवळ ४३, अगदी तडकाफडकी वारला होता.

त्याने पुन्हापुन्हा ती पोस्ट वाचली, काही कॉमन मित्रांना फोन केले; पण बातमी खरीच होती. काहीही व्याधी नसलेल्या हसतमुख, दिलदार मित्राच्या अकाली मृत्यूने त्याला पार अस्वस्थ करून टाकले... मंडळी, अशा दुःखद बातम्या, अकाली ङ्गएग्जिटफ ही आपल्याही सर्वांच्या वर्तुळात आपण पाहिली असतील. वयाच्या तिशी, चाळीशीत, पन्नाशीत माणसे दगावण्याचे - ते ही अचानक - प्रमाण गेल्या काही वर्षांत लक्षणीयरीत्या वाढले आहे. त्यातही महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे यात स्त्रियांपेक्षा पुरुषमृत्यू संख्येने जास्त असावेत. बहुतेकांना फार काही व्यसने होती, आजार होते असे नाही. पण अचानक हृदयविकाराच्या धक्क्याने किंवा तत्सम कारणाने मृत्यू झालेले आहेत. यात सर्वसामान्य माणसे, सेलेब्रिटी, जिममध्ये जाणारे असे सर्वच आहेत. फार्मरॅक ( ) या संस्थेने अलीकडेच एक अहवाल प्रसिद्ध केला. त्यानुसार गेल्या पाच वर्षांत हृदयविकारांशी संबंधित औषधांचा खप दरवर्षी साधारण दहा टक्के असा एकूण तब्बल ५० टक्क्यांनी वाढला आहे. जून २०२१मध्ये हृदयरोगावरील औषधांची विक्री १७६१ कोटी होती, ती जून २०२५मध्ये २६४५ कोटी झाली. हृदयावरील औषधांच्या निर्मितीत सिंहाचा वाटा असलेल्या १७ नामवंत फार्मा कंपन्यांच्या औषधांच्या विक्रीचा अभ्यास करून हा निष्कर्ष काढण्यात आला. कोलेस्टेरॉल कमी करणारी, उच्च रक्तदाबावरील, हृदयविकारावरील, मूत्रविसर्जन वाढवणारी, डाययुरेटिक अशी सगळी औषधे यात आहेत. अनेक नवी, काही जुनी, कमीअधिक महागडी असणारी औषधे यात अंतर्भूत आहेत आणि ही औषधे घेणारे हे सर्व वयोगटांतील आहेत. तरुण, मध्यमवयीन आणि अर्थातच वृद्ध. करोनामुळे शरीरात काही घडामोडी झाल्या का, त्याचे दूरगामी परिणाम म्हणून हृदयरोगाचे प्रमाण इतके वाढले का, अशी शंका प्रथमदर्शनी येईल; पण तसे निश्चित निष्कर्ष काढता येत नाहीत. उच्च रक्तदाबाची थोडी बदललेली मार्गदर्शक तत्त्वे, करोनापर्वानंतर आरोग्याविषयी अधिक सजग झालेले लोक (विशेषतः तरुण वर्ग) यामुळे वाढलेल्या चाचण्या आदींचा परिणाम थोड्याफार प्रमाणात असू शकतो. पण गेल्या दशकातील आढावा घेतला तर हृदयविकाराचे प्रमाण वेगाने वाढत आहे, हेच दिसते. त्यामुळे आपण एका मूक महासाथीत ( ) तर नाही ना, असे वाटू लागते. विविध संसर्गांमुळे होणारे मृत्यू कमी झाले असले तरी जीवनशैलीजन्य आजारांचा आलेख चढता आहे. त्यात हृदयविकार, मधुमेह हे अगदी जुळे आजार आघाडीवर आहेत. सन १९९०मध्ये १५ टक्के मृत्यू हे हृदयविकाराने होते, ते प्रमाण आता २८ ते ३० टक्के झाले आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या माहितीनुसार, २०१४ ते २०१९ या पाच वर्षांत हृदयविकाराच्या मृत्यूंमध्ये ५३ टक्के वाढ झाली. पूर्वी केवळ वयस्क लोकांमध्ये दिसणारे हे आजार आज अनेक तरुण आणि मध्यमवयीन लोकांमध्ये प्रामुख्याने दिसत आहेत, असे वेगवेगळे अहवाल सांगतात. फार्मासिस्टस आणि डॉक्टर वर्तुळातून यास दुजोराच मिळतो. गेल्या १०-१५ वर्षांत आमच्या ओपीडीचा चेहराच तरुण झाला आहे, असे अनेक कार्डिलॉजिस्ट आवर्जून सांगतात. हृदयविकाराचा झटका म्हातारपणी येतो, वगैरे समजुती ज्या पूर्वी सत्य होत्या त्या आता पार कोलमडून गेल्या आहेत. २०२० ते २०२३ या दरम्यान झालेल्या रुग्णालयीन अभ्यासानुसार, हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णांपैकी सुमारे ५० टक्के रुग्णांचे वय ४० वर्षांखालील होते. अमेरिकेत मात्र असे चित्र नाही. जीवनशैलीजन्य आजारात पूर्वीपासून आघाडीवर असणाऱ्या अमेरिकेसारख्या देशात हृदयरुग्णांची संख्या जरी वाढतच असली तरी हृदयविकाराने होणारे मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे. आणि लक्षवेधी बाब म्हणजे, जे मृत्यू होतात ते वृद्धांमध्ये; तरुण वर्गात नाही ही बाब खास नोंद घ्यावी अशी आहे. जगात हृदयविकाराने होणाऱ्या मृत्यूंपैकी ८० टक्के मृत्यू हे निम्न आणि मध्यम उत्पन्न स्तरातील देशांत होतात. आशियायी देशांत हृदयविकार वेगाने वाढत आहेत. इतर अनेक वंशाच्या लोकांपेक्षा भारतीयांमध्ये जनुकीय संरचना अशी आहे की, तुलनेने आपल्याला हृदयविकाराचा अधिक धोका आहे. हा मुद्दा आणि अनुवंशिकता, वाढते वय, धूम्रपान, प्रदूषण, ताणतणाव आदी बाबी आजारांना कारणीभूत असल्या तरी चुकीचा आहार आणि बैठी जीवनशैली, लठ्ठपणा ही त्यामागील मुख्य कारणे आहेत. या गोष्टींवर काम करणे सहज आपल्या हातात आहे. जसजशा सुखसोयी वाढल्या, जंक फ ूड, पॅकेज फूड वाढले, मोबाइल आणि स्मार्ट फोन आले तसतसे जीवनशैलीत, मानसिकतेत बदल झाले, निष्काळजी-बेदरकार वृत्ती वाढली आणि उच्चं रक्तदाब, हृदयविकार, स्ट्रोक, मधुमेह या सर्व आजारांचे प्रमाण या सर्व ङ्गप्रगतीशीफ समांतररीत्या वाढले. बाहेरचे खाणे (त्यात बरेचसे जंक फूड), वाट्टेल तेव्हा खाणे, अपुरी झोप, कामाच्या विचित्र वेळा, त्यामुळे बिघडलेले जैविक घड्याळ, अतोनात स्क्रीन टाइम, बैठे काम, व्यायामाचा कंटाळा या साऱ्याचा परिपाक म्हणजे तरुण वयातच शरीर सुटायला सुरुवात होते. चुकीच्या आहाराने आतड्यातील सूक्ष्मजीवांच्या वसाहतींना धक्का पोचतो. हृदयाच्या रक्तवाहिन्यांवर आणि इतर अनेक ग्रंथींवर दुष्परिणाम व्हायला सुरुवात होते. आणि एकेक आजार चालू होतात. फिटनेससाठी झटणारेही असतात, पण त्यांचे प्रमाण थोडेच. प्रत्येक दोन माणसांत एकाला काही ना काही व्याधी आहे. रक्तदाह, मधुमेह, वाढलेले कोलेस्टेरॉल... काहीतरी आहेच. कित्येक रुग्णांना आपण रुग्ण आहोत याची कल्पनाचच नाहीये. उच्च रक्तदाबाचे १९ ते २० कोटी रुग्ण आज आपल्या देशात आहेत. पण त्यापैकी केवळ सात कोटी व्यक्तींमध्ये रोगनिदान होऊन ते ङ्गरुग्णफ म्हणून गणले गेले आहेत. बाकीचे १२-१३ कोटी लोकांना आपला रक्तदाब वाढलेला आहे, याची कल्पनाच नाही. असे आजार चोरपावलांनी येतात. त्यांची लक्षणे दिसतातच, असे नाही. अनेक जण रोजच्या धावपळीच्या आयुष्यात किंवा पैशाअभावी डॉक्टरकडे जाण्याचे टाळतात. प्रत्येक ३ मुलांमध्ये एक लठ्ठ आहे. वाढलेले वजन हे हृदयविकारास आमंत्रणच. या सगळ्या गोष्टींकडे अतिशय गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. आता याला जोडून दुसरा मुद्दा. हृदयविकारांचे रुग्ण वाढले, त्यावरील औषधाचीमागणीवाढली; पणम्हणूनऔषधांच्याकिंमतीकमीझाल्याका? मागणी जास्त असेल तर वस्तू स्वस्त होतात, असे ढोबळ समीकरण आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# काँग्रेसचा गड राखण्यासाठी तारेवरील कसरत; भाजप बदला घेणार, रणनीतीही तयार, कोण ठरणार वरचढ?

**नागपूर :** नागपूर जिल्हा परिषद निवडणुकीचा रणसंग्राम पुन्हा पेटण्याच्या मार्गावर आहे. २०२० च्या निवडणुकीत काँग्रेसने भाजपचा गड भुईसपाट करत जिल्हा परिषद काबीज केली होती. महाविकास आघाडीच्या संयुक्त शक्तीमुळे भाजपला मोठा धक्का बसला होता. त्या वेळी ५८ जागांपैकी काँग्रेसने २६, राष्ट्रवादीने १२, शिवसेनेने १ आणि भाजपला केवळ १० जागांवर समाधान मानावे लागले होते. धापेवाडा येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या मूळ गावातही काँग्रेसचे महेंद्र डोंगरे विजयी ठरले होते.मात्र, आता परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने ग्रामीण भागात पुन्हा पाय रोवले आहेत. काँग्रेससाठी २०२० ची यशोगाथा पुन्हा लिहिणे सोपे राहिलेले नाही. सावनेर आणि काटोल या दोन प्रमुख मतदारसंघांतील बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे काँग्रेससमोर तारेवरील कसरत उभी राहिली आहे.२०२४ मध्ये भाजपने या वेळेस काँग्रेसच्या



बालेकिल्ल्यांवर थेट हल्ला चढवला आहे. उमरेडचे आमदार राजू पारवे यांना २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत शिंदे गटाकडून उमेदवारी देत काँग्रेसच्या माजी मंत्री सुनील केदार यांच्या समर्थक श्याम यांच्या विरोधात मैदानात उतरवले. त्याचबरोबर काँग्रेसचा खंदा समर्थक आणि जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष मनोहर कुंभारे यांनीही विधानसभा निवडणुकीदरम्यान भाजपमध्ये प्रवेश केला आहे. हा प्रवेश काँग्रेससाठी मोठा धक्का ठरला असून, केदार यांच्या संघटनात्मक बळावर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. राजकारणात दीर्घकाळ केदार यांच्यासोबत असलेल्या कुंभारे यांच्या जाण्यामुळे ग्रामीण भागात भाजपला मोठा फायदा होईल, असा अंदाज व्यक्त होत आहे. दरम्यान, जिल्हा बँक घोटाळा प्रकरणामुळे सुनील केदार यांना शिक्षा झाल्याने २०२४ ची विधानसभा निवडणूक त्यांना लढवता आली नाही. त्यांच्या जागी त्यांच्या पत्नी अनुजा केदार यांना उमेदवारी दिली होती.

सावनेरमध्ये काँग्रेस सोडून गेलेले आशिष देशमुख भाजपकडून विजयी ठरले. त्यामुळे सावनेरमधील काँग्रेस संघटना कमकुवत झाली. दुसरीकडे, काटोलमध्ये माजी मंत्री अनिल देशमुख यांनी निवडणूक न लढवता आपला मुलगा सलील देशमुख यांना उमेदवारी दिली, परंतु तिथे भाजपचे चरणसिंह ठाकुर यांनी विजय मिळवला.या पार्श्वभूमिवर आगामी जिल्हा परिषद निवडणूक काँग्रेससाठी प्रतिष्ठेचा प्रश्न ठरणार आहे. भाजपने आधीच संघटन मजबूत करण्यासाठी आणि ग्रामीण भागातील नाराजी दूर करण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सक्रिय नेतृत्वामुळे पक्षात नवचैतन्य आल्याचे दिसत आहे. २०१९ मध्ये त्यांना तिकीट नाकारल्याने झालेल्या नाराजीचा परिणाम २०२० च्या जिल्हापरिषद निवडणुकीच्या पराभवात दिसला होता. मात्र या वेळेस भाजप सावध आहे आणि गडकरी-फडणवीस जोडी पुन्हा रणांगणात उतरली आहे.दरम्यान, काँग्रेस आणि राष्ट्रवादीत समन्वयाचा अभाव, तसेच प्रमुख नेत्यांच्या अनुपस्थितीमुळे महाविकास आघाडीला अडचणी निर्माण होत आहेत. ग्रामीण नागपुरातील मतदारांच्या मनात २०२० च्या कामगिरीचा ठसा अजून ताजा असला तरी, भाजपच्या जोरदार प्रचारयंत्रणा आणि नव्या समीकरणांच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक पूर्णपणे चुरशीची ठरण्याची शक्यता आहे. आगामी नागपूर जिल्हा परिषदेत कोणता पक्ष आपला 'गड' राखतो किंवा नव्याने काबीज करतो, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## बिहारमध्ये अब की बार किसकी सरकार? मतदानाआधी ओपिनियन पोल समोर; स्पष्ट बहुमताचा अंदाज

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीचा धुरळा उडालेला असताना दोन ओपिनियन पोल समोर आले आहेत. ओपिनियन पोलचे आकडे पुढे आले आहेत. त्यानुसार राज्यात सत्ताधारी एनडीएला स्पष्ट बहुमत मिळेल. या निवडणुकीत भाजप सगळ्यात मोठा पक्ष ठरेल, असं भाकित वर्तवण्यात आलं आहे.IANS-Matrize च्या ओपिनियन पोलनुसार, एनडीएला १५३ ते १६४ जागा मिळण्याचा अंदाज आहे. बिहारमध्ये विधानसभेच्या एकूण २४३ जागा आहेत. बहुमतासाठी १२२ जागांचा आकडा गाठणं गरजेचं आहे. गेल्या निवडणुकीत एनडीएनं १२५ जागा जिंकत काठावरचं बहुमत मिळवलं होतं. तो आकडा यंदा एनडीए ओलांडताना दिसत आहे. भाजपला ८३ ते ८७ जागा, तर जेडीयूला ६१ ते ६५ जागा मिळण्याचा अंदाज आहे. दोन्ही प्रमुख पक्षांच्या जागा गेल्या निवडणुकीच्या तुलनेत वाढताना दिसत आहेत. एनडीएला ४९ टक्के मतं मिळण्याचा अंदाज आहे. बिहारमध्ये महागठबंधनला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. लालू प्रसाद यांच्या राष्ट्रीय जनता दलाला ६२ ते ६६ जागा मिळू शकतात. महागठबंधनला ७६ ते ८७ जागांवर यश मिळण्याची शक्यता आहे. सर्वाधिक धक्का काँग्रेसला बसू शकतो. देशातील सर्वात जुना पक्ष बिहारमध्ये केवळ ७ ते ९ जागा जिंकेल असा अंदाज आहे. सीपीआय-मालेला ६ ते ८ जागा मिळू शकतात. मुकेश सहनी यांच्या व्हिआयपीला १ ते २ जागांवर



समाधान मानावं लागू शकतं. ओपिनियन पोलनुसार, एनडीएला १३३ ते १४३ जागांवर, तर महागठबंधनला ९३ ते १०२ जागा मिळण्याचा अंदाज आहे. प्रशांत किशोर यांच्या जनसुराजला १ ते ३ जागा मिळू शकतात. किशोर यांचा पक्ष पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक लढत आहे. असदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएमला २ ते ३ जागांवर यश मिळण्याचा अंदाज आहे.

भाजपला ७० ते ७२, जेडीयूला ५३ ते ५६, हिंदुस्तान अवाम मोर्चाला ० ते २, तर लोकजनशक्ती (रामविलास) पक्षाला १० ते १२ जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर महागठबंधनमध्ये राष्ट्रीय जनता दलाला ६९ ते ७२ जागा, काँग्रेसला १० ते १३, डाव्या पक्षांना १४ ते १५, व्हिआयपीला १ ते २ जागा मिळू शकतात. एनडीएला ४५ टक्के, महागठबंधनला ३९ टक्के मतं मिळण्याचा अंदाज आहे. तर अन्य पक्षांना १६ टक्के मतं मिळू शकतात.

## जात पडताळणी, ॲप, दुबार मतदार टाळण्यासाठीची यंत्रणा सज्ज

**मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींचा निवडणुकीचा कार्यक्रम सविस्तर जाहीर केला. या सर्व नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी येत्या २ डिसेंबरला मतदान होईल. तर ३ डिसेंबरला मतमोजणी होईल. यावेळी निवडणूक आयुक्तांनी आणखी काही महत्त्वाची माहिती दिली. या निवडणुकीत प्रत्येक उमेदवारासाठी जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक असेल, असं निवडणूक आयुक्त म्हणाले. जात वैधता प्रमाणपत्राशिवाय निवडणूक लढवली तर ६ महिन्यांच्या आत प्रमाणपत्र जमा करावं लागेल. या कालावधीच्या आत प्रमाणपत्र नाही दिल्यास निवड रद्द केली जाईल, अशी स्पष्ट माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली.

या निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक म



शीनद्वारेच मतदान होणार असल्याची महत्त्वाची माहिती दिली. या निवडणुकीत ततझअढ चा वापर केला जाणार नाही. कारण या निवडणुकीत एका प्रभागात दोन उमेदवारांसाठी मतदान करायचं आहे. तशी यंत्रणा सध्या तरी उपलब्ध नसल्यामुळे ततझअढ चा वापर निवडणुकीत केला जाणार नसल्यची माहिती आयुक्तांनी दिली.मतदारांसाठी जे संकेतस्थळ दिलं आहे. त्यात सर्च फॅसिलिटी तिथे मतदारांना नाव आणि केंद्र शोधता येईल. मोबाईल ॲपद्वारे नाव आणि केंद्र शोधण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. उमेदवाराविषयी माहितीही यात उपलब्ध असेल.

# नागपुरात राजकारणात जोरदार हालचाली, मोठ्या घडामोडींचे संकेत

**नागपूर :** आगामी नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. आरक्षण सोडतीची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून ११ नोव्हेंबर रोजी प्रभागनिहाय आरक्षण जाहीर केले जाणार आहे. या सोडतीकडे सर्व राजकीय पक्ष, संभाव्य उमेदवार आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने आरक्षणाचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केला आहे. नागरिक आणि राजकीय पक्षांकडून हरकती आणि सूचना नोंदविण्यासाठी सात दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. या कालावधीत नागरिकांना प्रभागांच्या आरक्षणसंदर्भात आपले आक्षेप किंवा सूचना लेखी स्वरूपात सादर करण्याची संधी दिली गेली आहे

यानंतर आयोग अंतिम आरक्षण यादी




जाहीर करणार आहे. या सोडतीनंतर महानगरपालिका निवडणुकीच्या कार्यक्रमाला औपचारिक सुरुवात होणार आहे. त्यामुळे ११ नोव्हेंबर ही तारीख केवळ आरक्षण निश्चितीपुरती मर्यादित नसून अनेक संभाव्य उमेदवारांच्या राजकीय भवितव्याची दिशा ठरवणारी ठरणार आहे.नागपूर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १५१ वॉर्ड आहेत. यापैकी १२ जागा अनुसूचित जातींसाठी, ४ जागा अनुसूचित जमातींसाठी आणि ३५ जागा मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी राखीव असण्याची शक्यता आहे. तसेच, २० जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतील, अशी प्राथमिक माहिती आहे. या वेळी २०१७ प्रमाणेच बहुतांश प्रभागांमध्ये आरक्षण कायम राहू शकते, मात्र काही प्रभागांमध्ये पुरुष आणि महिला आरक्षणाच्या अदलाबदलीची शक्यता व्यक्त केली जात आहे.आरक्षण ठरवण्यासाठी प्रशासनाने पारदर्शक पद्धतीने कार्यवाही सुरू केली आहे.

सोडतीची प्रक्रिया अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या जागांपासून सुरू होणार असून, त्यानंतर उतरत्या क्रमाने इतर प्रवर्गांचे आरक्षण निश्चित केले जाईल. दरम्यान, या आरक्षण प्रक्रियेमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. अनेक माजी नगरसेवक आणि संभाव्य उमेदवारांनी त्यांच्या जुन्या प्रभागांमध्ये पुन्हा उमेदवारी मिळण्याची शक्यता लक्षात घेऊन गणित मांडण्यास सुरुवात केली आहे. तर काहींनी संभाव्य बदल लक्षात घेता नवीन प्रभागांमध्ये तयारी सुरू केली आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, यावेळी महापौर पदाचे आरक्षण देखील या यादीत निश्चित होणार आहे. त्यामुळे सर्व प्रमुख राजकीय पक्ष आपापल्या उमेदवारांच्या निवडीसाठी सज्ज झाले आहेत. मागील काही वर्षांपासून आरक्षणासंदर्भात तांत्रिक कारणांमुळे प्रक्रिया अडखळली होती, पण आता राज्य सरकारकडून मान्यता मिळाल्यानंतर निवडणूक आयोगाने अंतिम तयारी सुरू केली आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, या वेळी अनेक विद्यमान नगरसेवकांना त्यांच्या जागा राखीव झाल्याने अडचणीत यावे लागू शकते. परिणामी काहींच्या जागा बदलतील, तर काहींना उमेदवारीपासून दूर राहावे लागू शकते. नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीकडे केवळ राजकीय पक्षांचेच नाही, तर सर्वसामान्य मतदारांचेही लक्ष लागले आहे. ११ नोव्हेंबरची सोडत कोणत्या प्रभागाचे भविष्य ठरवते, आणि कोणत्या चेहऱ्यांना नवे राजकीय संधी मिळते, हे पाहणे आता उत्सुकतेचे ठरणार आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लाचखोर पीएसआय प्रमोद चिंतामणीचे कारनामे, घरातही ५१ लाखांची रोकड, एसीबीने घेतली झडती

**पुणे :** पुण्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एका पीएसआयला अटक केली आहे. ४६. ५ लाखांची लाच घेताना प्रमोद चिंतामणी नामक या पीएसआयला एसीबीने रंगेहाथ पकडले आहे. हा पोलिस पिंपरी चिंचवड पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत होता. दरम्यान, लाचखोर प्रमोद चिंतामणीच्या घरी ५१ लाख रुपयांची रोकड एसीबीच्या पथकाने कारवाईत जप्त केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे दाखल गुन्ह्यामध्ये मदत करण्यासाठी आरोपी पीएसआय प्रमोद चिंतामणीने दोन कोटींची मागणी केली होती. हे दोन कोटी टप्प्याने मिळणार असे ठरले होते. पहिला हप्ता हा रविवारी २ नोव्हेंबरला दिला जाणार होता. दोन कोटींपैकी ४६ लाख ५० हजार स्वीकारताना पुण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पीएसआय चिंतामणीला रंगेहाथ पकडले आणि बेड्या ठोकल्या.त्यानंतर काल ३ नोव्हेंबर रोजी प्रमोद चिंतामणी राहत असलेल्या त्याच्या भोसरीतील घराची झडती घेण्यात आली. यावेळी त्याच्या घरातून ५१ लाख रुपयांची रोख कोरड एसीबीच्या पथकाला मिळाली आहे. जी जप्त करण्यात आली आहे. प्रमोद चिंतामणी मूळचा कर्जुले हरियाळ तालुका-पारनेर, जिल्हा अहिल्यानगर येथील आहे. या रोकडसहीत दागिने व मालमत्तेची कागदपत्रंही एसीबीने कारवाईत

जप्त केली आहेत. याप्रकरणी आता सर्व दृष्टीकोनातून प्रमोद चिंतामणीची सखोल चौकशी केली जाणार आहे. आणखी एक




धक्कादायक खुलासा म्हणजे दोन कोटींपैकी एक कोटी रुपये वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांना दिले जाणार होते असा गौप्यस्फोट प्रमोदने एसीबी अधिकाऱ्यांच्या चौकशीत केला आहे. त्यामुळे आता या आर्थिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षकही चौकशीच्या फेऱ्यात येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, पोलिसांनीच अशा प्रकारे वर्तन करणे यावरून नागरिकांमध्येही तीव्र नाराजी आहे. संतापाची भावना व्यक्त केली जात आहे. सोशल मीडियावरुन अनेकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि कठोर कारवाई व्हावी अशी मागणी केली जात आहे. त्याचवेळी आरोपीच्या गावाकडील संपत्तीचीही चौकशी करावी अशा स्वरुपाची मागणी जनसामान्यातून केली जात आहे.

## महिलांचं CCTV फूटेज चोरलं, मुंबई-पुण्यासह देशभरातील ५० हजार क्लीप्स लीक

**गांधीनगर :** राजकोट शहरातील एका हॉस्पिटलमध्ये सुरु झालेला हा प्रकार एका गंभीर सायबर घोटाळ्यात रुपांतरित झाला. हॅकर्सनी 'admin123' या डिफॉल्ट पासवर्डचा वापर करून हॉस्पिटलच्या सीसीटीव्ही सिस्टीममध्ये प्रवेश मिळवला. त्यानंतर महिला रुग्णांची तपासणी होतानाचे खाजगी सीसीटीव्ही फुटेज चोरले आणि मालामाल होण्यासाठी आंतरराष्ट्रीय पॉर्न नेटवर्कवर विकले. हॉस्पिटलच्या सीसीटीव्ही सिस्टीममध्ये जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ पर्यंत जवळपास एक वर्षाचा डेटा उपलब्ध होता. फेब्रुवारी २०२५ मध्ये पकडले जाईपर्यंत हॅकर्स नऊ महिन्यांत देशभरातील किमान ५०००० क्लिप्स चोरल्या. राजकोटमधील हॉस्पिटलमधून चोरलेले काही व्हिडिओ 'Megha Mbbs' आणि 'cp monda' सारख्या यूट्यूब चॅनेलवर पोस्ट केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. ग्राहकांना टेलिग्राम ग्रुप्सवर पाठवून हे फुटेज ७०० ते ४,००० रुपयांपर्यंत विकले जात होते.तपास यंत्रणांना देशभरातील सुमारे ८० सीसीटीव्ही डॅशबोर्ड हॅक झाल्याचे



आढळले. यामध्ये पुणे, मुंबई, नाशिक, सूरत, अहमदाबाद आणि दिल्ली यांसारख्या शहरांचा समावेश आहे. देशभरातील २० राज्यांमधील रुग्णालये, शाळा, कंपन्या, चित्रपटगृहे, कारखाने आणि अगदी खाजगी घरांचे सीसीटीव्ही फुटेज चोरीला गेले होते. फेब्रुवारी २०२५ मध्ये मुख्य आरोपींना अटक झाली असली तरी, जून २०२५ पर्यंत हे चोरलेले फुटेज टेलिग्राम ग्रुप्सवर उपलब्ध होते. बी.कॉम पदवीधर पारित धामेलीया याने हे काम करण्यासाठी तीन वेगवेगळ्या सॉफ्टवेअर प्रोग्राम्सचा वापर केला. चोरीला गेलेले लॉग इन डिटेल्स वापरले. दिल्लीत पकडला गेलेला दुसरा आरोपी रोहित सिसोदिया याने मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजीमध्ये डिप्लोमा केला होता.

## विवाहित महिलेचा तीक्ष्ण हत्याराने खून

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील बार्शी शहरामधील शेंडगे प्लॉटमध्ये राहणाऱ्या एका विवाहित महिलेचा तीक्ष्ण हत्याराने गळा चिरून खून करण्यात आला. हत्या प्रकरणातील संशयित आरोपी पोलीस स्टेशनमध्ये स्वतः हजर झाल्याची घटना घडली आहे. पोलिसांकडून रात्री उशिरापर्यंत फिर्याद नोंदविण्याचे काम सुरू होते. हा खून का झाला याबाबत पोलीस तपास सुरू आहे आहे. पूनम निरफळ असं हत्या झालेल्या महिलेचं नाव असून पूनम या औषधशास्त्र विषयात पदविकाधारक होत्या. केतन प्रकाश जैन असं संशयित आरोपीचे नाव आहे. सोमवारी दुपारी ३ ते ५ वाजेच्या दरम्यान पूनम रोडे-निरफळ यांचा तीक्ष्ण हत्याराने गळा चिरून हत्या झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पती दुसऱ्या जिल्ह्यात कामासाठी जात असल्याने पूनम या आपल्या इयत्ता सहावीमध्ये शिकणाऱ्या मुलासह बार्शी येथे राहत होत्या. सोमवारी सायंकाळी ५ च्या दरम्यान पूनम फोन घेत नसल्यामुळे घरी आलेल्या पतीने घर बंद असल्याचे कळाल्यामुळे गेटवरून घरात प्रवेश केला. तेव्हा त्यांना पत्नी रक्ताच्या थारोळ्यात पडलेली आढळली.

## मारहाण करणाऱ्यांना अटक करा, नाहीतर..' ; मनसेच्या नेत्याचा इशारा

**महाड :** शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) शहराध्यक्ष पंकज उमासरे यांच्यावर झालेल्या हल्ल्याने शिंदे गट आणि मनसे यांच्यातील संघर्ष उफाळून आला आहे. घटनेला चार दिवस उलटूनही आरोपींना अटक झाली नसल्याने मनसे नेते अविनाश जाधव यांनी आज महाड पोलिस ठाण्यात थेट पोलीस अधिकाऱ्यांवरच रोखठोक सवालांचा भडीमार केला.

महाड महाराष्ट्रात आहे की बिहारमध्ये? आरोपी खुलेआम फिरत आहेत, आणि पोलिस मात्र मौन का बाळगत आहेत?ङ्क असा संतप्त सवाल जाधव यांनी डीवायएसपी शंकर काळे आणि पोलीस निरीक्षक रमेश तडवी यांच्याकडे केला. त्यांनी पोलिसांना स्पष्ट अल्टिमेटम दिला. ते म्हणाले की ङ्घशनिवारपर्यंत आरोपींना अटक झाली नाही, तर सोमवारपासून महाड बंद ठेवला जाईल घटनेच्या निषेधार्थ महाडकरांमध्ये संतापाची लाट असून, मनसेने दिलेल्या या इशाऱ्यानंतर प्रशासनातही खळबळ



उडाली आहे. जाधव यांनी सांगितले की, ङ्घराजकीय दबावामुळे पोलीस निष्क्रिय झाले आहेत. आरोपींना पाठीशी घालून गुंडगिरी वाढवली जात आहे.

पण मनसे हे सहन करणार नाही. आम्ही न्याय मिळेपर्यंत आंदोलन करू,' असं अविनाश जाधव म्हणाले आहेत.या प्रसंगी मनसेचे वरिष्ठ पदाधिकारी संजय नाईक, योगेश चिले, चेतन उतेकर आदी उपस्थित होते. त्यांनी हल्ल्याच्या घटनेबाबत छायाचित्रे आणि पुरावे दाखवत आरोपी अजूनही कार्यक्रमात मुक्तपणे सहभागी होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. मनसेने या घटनेवरून राजकीय दबावाखाली काम करणाऱ्या पोलिसांवरही निशाणा साधला.

# महिला डॉक्टरवर स्वत:ला कोंडून घेण्याची आली वेळ, डोंबिवलीच्या सरकारी रुग्णालयात काय घडलं?

**ठाणे :** डोंबिवलीत केडीएमसी रुग्णालयात पुन्हा एकदा रुग्णाच्या नातेवाईकांचा गोंधळ समोर आला आहे. एका तरुणाने आत्महत्येचा प्रयत्न केला. स्थानिक नागरीक त्याला घेऊन शास्त्रीनगर रुग्णालयात आले. डॉक्टरांनी तरुणाला पुढील उपचारासाठी सायन रुग्णालयात घेऊन जाण्याचा सल्ला दिला. यावेळी रुग्णवाहिका आली. मात्र रुग्णवाहिकेत तरुणाचे नातेवाईक बसल्याने महिला डॉक्टरने मी नर्स आणि पोलीस घेऊन येते असे सांगून रुग्णवाहिकेतून बाहेर आले. हे पाहताच रुग्णाचे नातेवाईक आणि नागरीकांनी गोंधळ करण्यास सुरुवात केली. सुरक्षा रक्षकांना आरेरावी केली.



इतका गोंधळ केला की, महिला डॉक्टरला एका रुममध्ये स्वत:ला कोंडून घेण्याची वेळ आली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

डोंबिवलीतील शेलारनाका परिसरात राहणारा मोहम्मद हुसेने पावटे या २३ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. वेळीच त्याला पाहिल्याने त्याला कसेबसे खाली उतरवून शेजारी आणि नातेवाईकांनी उपचारासाठी शास्त्रीनगर रुग्णालयात घेऊन आणले. त्याची प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी त्याला पुढील उपचारासाठी सायन येथे पाठविले. त्याला नेण्यासाठी रुग्णवाहिका आली. रुग्णासोबत त्याचे नातेवाईक रुग्णवाहिकेत बसले.रुग्णवाहिकेत जास्त लोक असल्याने महिला डॉक्टरने मी, नर्स आणि पोलिस घेऊन येते, असे सांगितले. हे ऐकताच संतप्त झालेल्या रुग्णाच्या नातेवाईकांसह नागरीकांनी गोंधळ सुरु केला. गोंधळ पाहून महिला डॉक्टरवर स्वत:ला कोंडून घेण्याची वेळ आली. सुरक्षा रक्षकांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्यासोबतही नातेवाईक आणि नागरीकांनी आरेरावी केली.रुग्णांची प्रकृती गंभीर आहे. परंतू डॉक्टरची मनसिकता देखील समजणे महत्वाचे आहे. डॉक्टरने सोबत जाण्यास नकार दिला नव्हता असे प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र या घटनेच्या व्हिडिओत नातेवाईक आणि नागरीक गोंधळ करून रुग्णालयातील डॉक्टर आणि स्टाफ सोबत आरेरावी करीत शिवीगाळ करीत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, आता या प्रकरणात पोलिसांकडून काही कारवाई केली जाते का? ते पाहणे महत्त्वाचे आहे. संबंधित व्हिडीओवर पोलिसांची काय भूमिका असेल? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# स्मृती मानधनाला मोठा धक्का

**नवी दिल्ली :** भारत वर्ल्ड चॅम्पियन ठरला. भारताने प्रथमच वर्ल्ड कप जिंकला. स्मृती मानधनाने भारतासाठी सर्वाधिक धावाही केल्या. पण आता वर्ल्ड कप संपल्यावर स्मृती मानधानाला एक मोठा धक्का बसला आहे. भारताने वर्ल्ड कप जिंकला आणि त्यानंतर स्मृती मानधनासाठी वाईट बातमी आली आहे.

भारताला जेव्हा जेव्हा धावांची गरज होती, तेव्हा स्मृती मानधना संघासाठी धावून आली. फायनलमध्येही पाऊस पडला असला तरी तिने संघाचा चांगली सुरुवात करून दिली. संपूर्ण वर्ल्ड कपमध्ये स्मृतीने सातत्याने धावा केल्या. त्यामुळे या वर्ल्ड कपमध्ये स्मृती ही भारतीयांच्या गळ्यातील ताइत बनली होती. पण आता भारताने वर्ल्ड कप जिंकला. संपूर्ण भारत विजयाचे सेलिब्रेशन करण्यात मग्न आहे. पण दुसरीकडे स्मृती मानधनाला मात्र एक मोठा धक्का बसला आहे.वर्ल्ड कपच्या कामगिरीची दखल आता आयसीसीने घेतली आहे. आयसीसीने वर्ल्ड कपनंतर महिलांची क्रमवारी जाहीर केली आहे. भारताची सलाम ीवीर स्मृती मानधना ICC च्या महिला एकदिवसीय क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर घसरली आहे, परंतु जेमिमा रॉड्रिग्ज नऊ स्थानांनी पुढे जाऊन १० व्या स्थानावर पोहोचली आहे. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वाड्र्टने ताज्या यादीत दोन स्थानांनी प्रगती केली आहे. वोल्वाड्र्टने मानधना यांना मागे टाकले, तिने सेमीफायनल आणि फायनल दोन्हीमध्ये शतके झळकावली. वोल्वाड्र्टने स्पर्धेत ५७१ धावा केल्या, जो एका विश्वचषकात सर्वाधिक धावांचा नवा विक्रम आहे. याम ुळे तिला तिचे कारकिर्दीतील सर्वोच्च ८१४ रेटिंग मिळविण्यासाठी म दत झाली. त्यामुळे आता भारताने वर्ल्ड कप जिं क ला



असला तरी स्मृती मानधनाला आयसीसीच्या क्रमवारीत मोठा धक्का बसला आहे. कारण स्मृतीला क्रमवारीतील अव्वल स्थानावरुन पायउतार व्हावे लागले आहे.रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करून प्रथमच विश्वविजेतेपद मिळवले. नवी मुंबईत झालेल्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या नाबाद शतकासह भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या रॉड्रिग्जने तिच्या प्रभावी कामगिरीमुळे टॉप १० मध्ये प्रवेश केला. त्याच सामन्यातील शतकामुळे फोबी लिचफिल्डने १३ स्थानांनी झेप घेऊन कारकिर्दीतील सर्वोत्तम १३ व्या रँकिंगवर (६३७) पोहोचली. ऑस्ट्रेलियाची एलिस पेरी सातव्या स्थानावर पोहोचली आहे आणि न्यूझीलंडच्या सोफी डेव्हाईनसह सातव्या स्थानावर आहे. डेव्हाईनने आधीच एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर देखील चार स्थानांनी पुढे सरकून १४ व्या स्थानावर पोहोचली आहे.आयसीसीच्या गोलंदाजी क्रमवारीत, दक्षिण आफ्रिकेची मॅरिझाने कॅप आता ७१२ रेटिंग गुणांसह सोफी एक्लेस्टोनला अव्वल स्थानावरून मागे टाकण्याच्या जवळ आहे. विश्वचषक अंतिम फेरीत ५८ धावा आणि पाच विकेट्स घेणारी भारताची दीप्ती शर्मा अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत चौथ्या स्थानावर पोहोचली आहे.

## मोहासेन नक्वी याच्यावर तोंड लपवण्याची वेळ

**नवी दिल्ली :** भारताने आशिया कपची ट्रॉफी मिळवण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना अद्याप ट्रॉफी मिळू शकलेली नाही. आयसीसीच्या बैठकीला मंगळवारपासून सुरुवात झाली. ही बैठक चार दिवस चालणार आहे. या बैठकीत भारत मोहसिन नक्वी यांच्यावर जोरदार हल्ला चढवणार होते. पण ही गोष्ट मोहसिन नक्वी यांना समजली आणि त्यांच्यावर आता तोंड लपवण्याची वेळ आली आहे. आपल्यावर भारत आरोपांच्या फैरी झाडणार, हे मोहसिन नक्वी यांना सम जले. त्यामुळे मोहसिन नक्वी यांनी आता आयसीसीच्या बैठकीलाच न जाण्याचा निर्णय घेतला आहे. आयसीसीच्या बैठकीला जर आपण उपस्थित राहिलो नाहीच तर भारत आपल्याविरोधात काहीच करू शकत नाही, असे मोहसिन नक्वी यांना वाटत आहे. पण मोहसिन नक्वी यांनी बैठकीला न जाण्याचा निर्णय घेतला असला तरी भारत आशिया कपच्या ट्रॉफीचा मुद्दा काढणार नाही, असे होणार नाही. त्यामुळे आता आयसीसीच्या बैठकीत भारत आपली बाजू कशी मांडतो आणि आशिया कपच्या ट्रॉफीबाबत नेम का काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

## वर्ल्ड कप जिंकवणारी हरमनप्रीत कौरच संघाबाहेर, खउउ च्या कोणत्या तीन भारतीयांना संधी..

**नवी दिल्ली :** भारताला जिने वर्ल्ड कप जिंकवून दिला, त्या हरमनप्रीत कौरलाच आता संघात स्थान देण्यात आलेलं नाही. आयसीसीने वर्ल्ड कपचा सर्वोत्तम संघ नुकताच जाहीर केला. या संघात भारताच्या तीन खेळाडूंना मात्र संधी देण्यात आली आहे.हरमनप्रीत कौरचे भारताच्या विश्वविजयात सर्वात मोठे योगदान आहे. कारण हरमनप्रीतने चाणाक्षपणे भारताचे नेतृत्व केले. परिस्थितीनुसार बदल केले, जे मास्टरस्ट्रोक ठरले. भारताच्या युवा खेळाडूंना तिने मार्गदर्शन केले आणि भारताला पहिला वर्ल्ड कप जिंकवून दिला. पण त्याच हरमनप्रीत कौरला आयसीसीने संघाबाहेर केले आहे. या संघात शेफाली वर्मालाही आयसीसीने स्थान दिलेले नाही. त्यामुळे या संघात भारताचे तीन खेळाडू आहेत तरी नेमके कोण, हा प्रश्न आता चाहत्यांना पडेलला आहे.आयसीसीच्या या संघात भारताची सलामीवीर स्मृती मानधनाला संधी देण्यात आली आहे. कारण वर्ल्ड कपमध्ये तिने सातत्याने दमदार कामगिरी केली होती. या संघात भारताची दुसरी खेळाडू आहे ती जेमिना रॉड्रिग्ज. कारण भारताने हा वर्ल्ड कप तेव्हाच जिंकला जेव्हा जेमिमाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात धडाकेबाज शतक झळकावले.



कारण ऑस्ट्रेलियाला पराभूत करणे हे सर्वात कठीण समजले जात होते. पण जेमिमाच्या शतकामुळे भारताला विजय मिळवता आला आणि त्यामुळे तिला या संघात स्थान देण्यात आले आहे. आयसीसीच्या या संघात तिसरी भारतीय खेळाडू ठरली आहे ती दीप्ती शर्मा. वर्ल्ड कपमध्ये सातत्याने चमकदार कामगिरी तिने केली. वर्ल्ड कप स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कारही तिला मिळाला. त्यामुळे तिला या संघात स्थान देण्यात आले आहे.

## हस्तांदोलन टाळणं पडल महागात

**नवी दिल्ली :** आशिया कपमध्ये भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तानच्या कर्णधाराशी हस्तांदोलन न करण्याचा निर्णय घेतला होता. पण आता पाकिस्तानशी हस्तांदोलन टाळणं हे सूर्यकुमार यादवला चांगलंच महागात पडलेलं आहे. कारण आयसीसीने आपल्या बैठकीत सूर्यकुमार यादवला दोषी ठरवले असून त्याच्यावर कारवाई केली आहे.



आयसीसीने सूर्यकुमार यादववर कारवाई करताना त्याला दोषी ठरवलं आहे. सूर्याने जे केलं ते खेळभावनेला धरून नसल्याचे म्हटले जात होते आणि हीच गोष्ट आयसीसीच्या बैठकीतही मांडली गेली. त्यामुळे आयसीसीने त्याच्यावर कारवाई केली आहे. आयसीसीने सूर्यकुमार यादवला हस्तांदोलन न केल्यामुळे दोन डिमेरीट गुण दिले आहेत, त्याचबरोबर सूर्याच्या मानधनातील ३० टक्के रक्कम दंडाच्या स्वरुपात कापण्यात येणार आहे. त्यामुळे आता सूर्याला हा दंड भरावा लागेल, त्याचबरोबर सुर्याने जर पुन्हा अशी चूक कली तर त्याच्यावर बंदीची कारवाई होऊ शकते, असे म्हटले जात आहे.

आयसीसीने सूर्यकुमार यादवला दोषी धरलं आहे आणि त्याच्यावर कडक कारवाई केली आहे. सूर्याच्या मानधनातील कित रक्कम यावेळी कापण्यात येणार आहेत, हे आका समोर आले आहे

# पाकिस्तानी खेळाडू हारिस रऊफवर बंदी

**नवी दिल्ली :** टीम इंडियाने आशिया कप २०२५ चे विजेतेपद जिंकले. भारताने अंतिम सामन्यात पाकिस्तानला चार विकेट्सने हरवून आशिया कप ट्रॉफी जिंकली. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान तीन वेळा आमनेसामने आले आणि तिन्ही वेळा टीम इंडिया जिंकली. आशिया कप २०२५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील प्रत्येक सामना वादग्रस्त ठरला आहे . आता, आयसीसीने या प्रकरणात पहिला निर्णय जारी केला आहे.

आयसीसीने १४ आणि २८ सप्टेंबरच्या सामन्यांसाठी पाकिस्तानी वेगवान गोलंदाज हरिस रौफला शिक्षा दिली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने हरिस रौफला १४ सप्टेंबरच्या सामन्यासाठी दोन आणि १४ सप्टेंबरच्या सामन्यासाठी दोन डिमेरिट पॉइंट्स दिले आहेत. यामुळे २४ महिन्यांच्या चक्रात हरिसचे एकूण चार डिमेरिट पॉइंट्स आणि दोन सामन्यांची बंदी झाली आहे. हरीळी–ीर्ीष–लरपपशव हरिस आता पुढील दोन सामन्यांसाठी पाकिस्तान संघाबाहेर राहणार आहे. १४ सप्टेंबरच्या साम न्यासाठी सूर्यकुमार यादवला ३०% दंड ठोठावण्यात आला आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सुपर ४ स्टेज सामना २१ सप्टेंबर रोजी खेळवण्यात आला. या सामन्याची सुनावणी मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांनी घेतली. भारतीय वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगवर कलम २.६




अंतर्गत आरोप लावण्यात आला, जो अश्लील किंवा आक्षेपार्ह हावभावांशी संबंधित आहे. तथापि, चौकशीनंतर तो निर्दोष आढळला आणि त्यामुळे त्याला कोणतीही शिक्षा देण्यात आली नाही. २८ सप्टेंबर रोजी खेळवण्यात आलेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दोन खेळाडूंवर कारवाई करण्यात आली. टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह (भारत) वर कलम २.२१ अंतर्गत आरोप लावण्यात आला आणि त्याला अधिकृत इशारा आणि एक डिमेरिट पॉइंट मिळाला. त्याने ही शिक्षा स्वीकारली, त्यामुळे औपचारिक सुनावणीची आवश्यकता नव्हती. हरिस रौफ पुन्हा एकदा त्याच कलमाचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळला. रिची रिचर्डसन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुनावणीत त्याला त्याच्या मॅच फीच्या ३०% आणि दोन अतिरिक्त डिमेरिट पॉइंट दंड ठोठावण्यात आला.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पहिल्याच भेटीत उंचीवरुन खिल्ली, विराटने अनुष्काच्या हिल्सवरुन केलेली गंमत

**मुंबई :** आज भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहली चा वाढदिवस आहे. तो आज ३६ वर्षांचा झाला. विराटने अगदी कमी वयात भरघोस यश संपादन केले. त्याने अनेकदा त्याच्या कामगिरीतून भारतीयांची मनं जिंकून घेतली. विराट कोहली अनेकदा त्याच्या यशाचे श्रेय आपली पत्नी अनुष्का शर्माला देतो. तिने नेहमीच त्याच्या करियरच्या चढउतारात साथ दिली आहे. या दोघांचे लग्न कसे झाले हे सर्वांनाच माहित आहे.पण या भेटीच्या क्षणी दोघांमध्ये काय संवाद झालेला माहित आहे का? अनुष्का शर्मा , स्वतः एक अभिनेत्री आहे, तिची विराट कोहलीला भेटण्याची आणि प्रेमात पडण्याचा एक किस्सा आहे जो पूर्णपणे फिल्मी आणि रोमँटिक आहे. हा किस्सा आहे २०१३ चा,




जेव्हा एका शॅम्पू कंपनीने या दोन्ही स्टार्सना एका जाहिरातीच्या शूटिंगसाठी आमंत्रित केले होते. असे म्हटले जाते की ही जाहिरात देशभरातील टेलिव्हिजन सेटवर प्रसारित होताच, क्रिकेट आणि बॉलिवूड चाहत्यांनी त्यांच्या ऑनस्क्रीन केमिस्ट्रीमागे अंदाज लावण्यास सुरुवात केली.त्यानंतर लगेचच, अनुष्काने एका मुलाखतीत विराटशी झालेल्या तिच्या भेटीबद्दल सांगितले. अभिनेत्री म्हणाली, 'जर तुम्ही मला विचाराल, 'विराट माझ्या घरी आला होता का? तर हो. तो माझा मित्र आहे का? तर हो. मी त्याला ओळखते का? तर हो. पण अशा अनेक गोष्टी आहेत ज्या लोकांना माहित नाहीत. आम्ही एक जाहिरात केली. सुरुवातीला मला वाटले की तो गर्विष्ठ आहे, जो तो दिसतोच.'अनुष्का पुढे म्हणाली, 'जेव्हा आम्ही शूटसाठी अभिनय करत होतो, तेव्हा मला वाटले की मी आणखी चांगले करू शकते, पण जेव्हा मी त्याला भेटले तेव्हा तो खूप साधा, बुद्धिमान आणि मजेदार माणूस होता. आम्ही तीन दिवस शूट केले आणि नंतर दुसऱ्याया रात्री मी माझ्या मित्रांना मी नवीन घर घेतल्याच्या पार्टीसाठी आमंत्रित केले होते, तेव्हा मी त्यालाही आमंत्रित केले. तिथूनच हे सर्व सुरू झाले.

इतर लोकही होते, पण ते चर्चेत नाही आले.'त्या जाहिरातीनंतर नऊ वर्षांनीही, विराट आणि अनुष्का अजूनही एकत्र आहेत आणि विवाहित जोडपे असण्यासोबतच, आता दोन मुलांचे पालक म्हणूनही चर्चेत आहेत. या वर्षी जानेवारीमध्ये त्यांनी त्यांच्या पहिल्या अपत्याचे, मुलगी वामिकाचे स्वागत केले. त्यांच्या लग्नाला आता तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे.विराट त्या जाहिरातीचे नेहमीच आभार मानतो ज्यामुळे ते एकत्र आले. तो म्हणाला, 'आम्ही विनोद करू लागलो. मी नेहमीच मूर्ख बनवत होतो. माझे काही विनोद खरोखरच मूर्खासारखे होते, पण मी असाच आहे. मला मजा करायला आणि हसायला आवडते. मी ती शॅम्पू जाहिरात केली याचा मला खूप आनंद आहे.'



## रिक्षाचालकाने माझा हात पिरगळला, मारहाण केली'




**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री शमीम अकबर अली संबंधित एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका ऑटोरिक्षा चालकाने दिवसाढवळ्या अभिनेत्रीचा विनयभंग केला. अभिनेत्रीनं खुलासा केला की, तिची ५ वर्षांची मुलगीही घटनास्थळी उपस्थित होती. अभिनेत्री शमीम अकबर अलीने आरोपी रिक्षा चालकाविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. काय घडलेलं नेमकं? जाणून घेऊया.इन द मंथ ऑफ जुलै' सिनेमातून प्रसिद्धी मिळवलेल्या शमीम अकबर अलीने मिड-डेला दिलेल्या मुलाखतीमध्ये एका ऑटोरिक्षा चालकाने तिच्यासोबत विनयभंग केल्याचा घडलेला प्रकार सांगितला. ही घटना १ नोव्हेंबर रोजी दुपारी घडली. शमीमने सांगितलं की, कनाकिया जिममधून वर्क आऊट संपवून तिनं ऑटो रिक्षा बोलवली आणि तिच रिक्षा घेऊन जेव्हा ती दुपारी २:४५ वाजता तिच्या मुलीला शाळेत घेण्यासाठी आली आणि ड्रायव्हरला थांबण्यास सांगितलं तेव्हा तो चिडला आणि तिच्यासोबत गैरवर्तन करू लागला. ड्रायव्हरने अभिनेत्रीला शिवीगाळ केली. त्यानं घाईघाईनं तिच्याकडे भाडं मागितलं. शमीमने सांगितलं, तिलासुद्धा घाई होती, म्हणून ती तिच्या मुलीला उचलून घेऊन त्याच रिक्षात बसली आणि ड्रायव्हरला तिला घरी सोडण्यास सांगितलं.शमीमने पुढे सांगितलं की, 'रिक्षावाल्याने आम्हाला सोसायटीच्या जवळ आणलं. माझी मुलगी म्हणाली आई फाऊंटन जवळ चल. त्यानंतर मी माझ्या मुलीला सांगितलं की, आपण दुसऱ्या रिक्षाने जाऊ. हे ऐकल्यानंतर तो रिक्षा चालक एकदम भडकला. त्याने माझ्या मुलीसमोरच माझा हात धरला आणि पिरगळला. त्यानंतर मला त्याने माझ्या मुलीसमोरच मारहाण केली.'या प्रकरणाबाबत शमीमने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## अमृता फडणवीसांचा ब्लॅक गाऊनमध्ये लूक, नक्षीदार जॅकेटने वेधलं लक्ष



**मुंबई :** तीस वर्षांनंतर त्या त्याच शाळेच्या वार्षिक समारंभाला मुख्य अतिथी म्हणून अमृता फडणवीस परतल्या. यावेळी त्यांच्या लूकवरून कोणाचीच नजर हटली नाही. या खास प्रसंगासाठी अमृता फडणवीस यांनी ब्लॅक गाऊन आणि झगमगणारं नक्षीदार जॅकेट परिधान केलं होतं. त्यांच्या या एलिगंट आणि क्लासी लूकने सगळ्यांचं लक्ष वेधलं. हलका मेकअप, सरळ मोकळे केस आणि हातात सिल्व्हर ब्रेसलेट या साध्या पण सुंदर ॲक्सेसरीजमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक वेगळी झळक आली होती. त्याचा हा लुक खूपच रॉयल वाटत होता. काळ्या रंगाच्या गाऊनने त्यांच्या स्टाइलला एक क्लासिक टच दिला होता.

अमृता फडणवीस नेहमीच त्यांच्या स्टायलिश आणि ग्रेसफुल लूकसाठी ओळखल्या जातात. अलीकडेच त्यांनी परिधान केलेला ब्लॅक गाऊन आणि नक्षीदार जॅकेट यामुळे त्या पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. हा लूक जितका साधा, तितकाच आकर्षक आहे.ब्लॅक गाऊनच्या समोरच्या भागात हलकं गाठीसारखं डिझाइन असून त्याने ड्रेसला एक सुंदर फिटिंग आणि मॉडर्न टच दिला आहे. त्यावर त्यांनी घातलेलं सिल्व्हर बीडवर्क असलेलं जॅकेट पूर्ण लूकला ग्लॅमर देतं. या जॅकेटचा पंखासारखा नक्षीदार पॅटर्न अतिशय उठून दिसतो.अमृता फडणवीस यांचा मेकअप त्यांच्या व्यक्तिमत्त्वासारखाच सोज्वळ आणि नैसर्गिक दिसतो.

## प्राजक्ता माळी कृष्णभक्तीत तल्लीन

**पुणे :** प्राजक्ता माळीने ८ ऑगस्ट रोजी तिच्या ३६ व्या वाढदिवशी एक मोठा संकल्प पूर्ण केला. तिने १२ ज्योतिर्लिंग यात्रा पूर्ण केली असून, भीमा शंकर ज्योतिर्लिंग मंदिरात दर्शन घेऊन हा संकल्प पूर्णत्वास नेला होता. तिने पूर्ण केलेल्या १२ ज्योतिर्लिंग यात्रेविषयी अभिनेत्रीने विविध पोस्ट सोशल मीडियावर शेअर केल्या आहेत. प्राजक्ता अनेकदा असेही म्हटले आहे की, ती शिवभक्त आहे. शिवभक्तीत रमणारी प्राजक्ता आता कृष्णभक्तीत तल्लीन झाल्याचे पाहायला मिळाले. अभिनेत्रीने तुळशी विवाहाच्या मुहूर्तावर भगवद्गीता वाचायला सुरुवात केल्याचे सांगितले.



# गोविंदावर संतापली सुनीता अहुजा



**मुंबई :** गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता अहुजा गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्या लग्नाच्या आणि घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत आहेत. दरम्यान, सुनीतानं तिचा पती गोविंदाबद्दल आणखी एक मोठा खुलासा केला आहे. तिनं सांगितलं की, तो धार्मिक कार्यक्रमांवर लाखो रुपये खर्च करतो, पण तिला आर्थिक मदत करत नाही.सुनीता अहुजाने नुकतीच टीव्ही अभिनेता आणि 'बिग बॉस १३' फेम पारस छाब्राच्या पॉडकास्टला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये सुनीताने सुरुवातीला तिचा पती गोविंदाबद्दल चिंता व्यक्त केली. सुनीता म्हणाली की, 'चिचीला वजन कमी करण्याची गरज आहे, त्याची त्वचा खराब झाली आहे. त्याने स्वतःची काळजी घ्यावी, ही माझी इच्छा आहे. त्याने अलीकडेच सांगितलं की, तो तीन सिनेमे करत आहे. पण मला वाटतं, त्याची अडचण अशी आहे की, त्याला चांगली टीम भेटलेली नाही. त्याचे मित्रही चांगले नाहीत. ते त्याला चांगला सल्लाही देत नाहीत.'सुनीता पुढे म्हणाली की, 'मी खरं बोलते म्हणून मला त्याची माणसं आवडत नाहीत. प्रत्येकजण माझ्याबद्दल त्याचे कान भरतो आणि तो प्रत्येकावर विश्वास ठेवतो. माझी एकच इच्छा आहे की, एक वृद्धाश्रम आणि प्राण्यांसाठी घर बांधावं. मी हे माझ्या स्वतःच्या पैशाने करेन. मी गोविंदाकडून एकही रुपया घेणार नाही. कारण, तो मला पैसे देत नाही. त्याचे चमचे त्याचे कान भरतात. तो फक्त धार्मिक कार्यावर पैसे खर्च करतो'दरम्यान, गोविंदा आणि सुनीता अहुजा यांनी ११ मार्च १९८७ रोजी गुपचूप लग्न केलं. त्यांची मुलगी टीनाच्या जन्मापर्यंत त्यांनी त्यांचं लग्न गुप्त ठेवलं. या जोडप्याची मुलगी टीना आहुजाने तिच्या वडिलांप्रमाणेच चित्रपटांमध्ये पदार्पण केलं, पण तिला यश मिळालं नाही. आता, अभिनेत्याचा मुलगा यशवर्धन अहुजा बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्यासाठी सज्ज आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आधारभुत किंमत योजना; मुंग, उडिद व सोयाबिन खरेदीसाठी नोंदणी करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलडाणा

राज्य शासनाच्या आधारभुत किंमत योजनेंतर्गत सन २०२५-२६ वर्षीच्या हंगामामध्ये हमी दरात मुंग, उडिद व सोयाबिन खरेदीकरीता दि. ३० नोव्हेंबर २०२५ पासून नोंदणी सुरु होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह खरेदी केंद्रावर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी एस.डी.गावंडे यांनी केले आहे. जिल्ह्यामध्ये मुंग, उडिद व सोयाबिन खरेदीसाठी बुलढाणा जिल्ह्यातील या कार्यालयअंतर्गत तालुका शेतकी सहकारी खरेदी विक्री समिती मर्या. बुलढाणा, मेहकर, लोणार, संग्रामपूर, शेगांव व स्वराज्य शेतीपुरक सहकारी संस्था, चिखली अशी सहा खरेदी केंद्रांवर नोंदणी सुरु करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. शेतकऱ्यांनी नोदंणीसाठी आधारकार्ड, सातबारा ऑनलाईन पिकपेरासह, बँक पासबुकची आधारलिंक केलेली झेरॉक्स.व मोबाईल क्रमांक इत्यादी कागदपत्रांसह संबंधीत खरेदी केंद्रावर जाऊन मुंग, उडिद व सोयाबिन खरेदीकरीता नोंदणी करावी, असे आवाहण करण्यात आले आहे.

# देऊळगाव राजा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शुक्रवारी वंदे मातरम गित गायन कार्यक्रम

जनसंचलन/बुलढाणा

कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबईच्या विद्यमाने देऊळगाव राजा औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या वतीने शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर२०२५ रोजी दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय देऊळगाव राजा जि. बुलढाणा येथे सकाळी ९.३० वाजता वंदे मातरम गित गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन देऊळगाव राजा औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे प्र. प्राचार्य कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार मनोजभाऊ कायंदे यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच तहसीलदार वैशाली डोगरजाळ, स्थनिक परिसरातील प्रशासकिय अधिकारी, शाळा/महाविद्यालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक अंतिम आरक्षण जाहीर




जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ३ नोव्हेंबर रोजी अंतिम आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही अधिसूचना जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार बुलढाणा जिल्हा परिषदेतील आरक्षित निवडणूक विभागांची जाहीर सोडत १३ ऑक्टोबर रोजी काढण्यात आली होती. त्यानंतर निवडणूक विभागनिहाय आरक्षण प्रसिद्ध करुन त्यावर १४ ते १७ ऑक्टोबर या कालावधीत हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त हरकती व सुचनांवरील सुनावणी घेवून आरक्षणास विभागीय आयुक्तांची घेण्यात आली. त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी बुलढाणा जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक आरक्षणाची अधिसूचना जारी केली आहे. सदर अधिसूचना ही जिल्हा परिषद कार्यालय, सर्व तहसिल कार्यालये, पंचायत समिती कार्यालयांच्या सूचना फलकांवर प्रसिद्ध करण्यात आली आहे

# गुरुवारी ६ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन...

जनसंचलन/बुलडाणा

युवकांचा सर्वांगिण विकास व्हावा, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागावे यासाठी युवा कार्यक्रम, खेळ मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. सन २०२५-२०२६ वर्षातील जिल्हास्तर युवा महोत्सव गुरुवार दि. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बुलढाणा येथील बहुद्देशिल हॉल येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर यांनी दिली आहे. जिल्हास्तर युवा महोत्सवांत संकल्पना आधारीत स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम (यात समुह लोकनृत्य, समुह लोकगीत) कौशल्य विकास कार्यक्रम (यात कथालेखन, चित्रकला वक्तृत्व, कवितालेखन), विज्ञान प्रदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हास्तर युवा महोत्सवांत प्राविण्य प्राप्त केलेला संघ, युवा कलाकार यांना त्यांनी प्राविण्य प्राप्त केल्यानुसार विभागस्तरावर आपली कला सादर करण्याची संधी मिळेल. त्यानुसार विभागावर प्राविण्य प्राप्त झाल्यास राज्यस्तरावर व राज्यस्तरावरुन प्राविण्य प्राप्त केल्यास राष्ट्रीय युवा महोत्सवांत सहभागी होण्याची संधी प्राप्त होणार आहे. तसेच प्रत्येक स्तरावर प्राविण्य प्राप्त झाल्यास शासना कडुन प्राविण्य प्राप्त युवा कलाकार युवा संघ यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र, मोमेन्टो देण्यात येईल. युवा महोत्सवांत १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभागी होवु शकतील(दि.१२ जानेवारी २०२६ या दिनांक रोजी वयाची परिगणना १५ ते २९ असावी), जन्म तारखेबाबत सबळ पुरावा म्हणुन जन्माचा दाखला जोडणे आवश्यक आहे. त्यानुसार आपल्या अधिपत्याखालील महाविद्यालय/विद्यालय/मंडळ यांना जिल्हास्तर युवा महोत्सवात सहभागी होण्याकरीता आपल्या स्तरावरुन अवगत करुन १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती यांना सहभागी होण्याबाबत आदेशित करुन सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रवेश अर्ज व ओळखपत्र जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे किंवा . या मेलवर जमा करावी. अधिक माहीतीसाठी क्रीडा अधिकारी आर.आर. धारपवार (९९७०१८७७९७) यांच्याशी संपर्क साधावा.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा



बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# १४ एकर जमीन प्रकरणात स्फोटक वळण! भंडारे यांची प्रतिमा काळवंडण्याचा रचलेला कट? गुन्हा दाखल!

**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांचे विशेष कार्याधिकारी () सिद्धार्थ भंडारे यांच्यावर तब्बल ४.५ कोटी रुपये किंमतीची १४ एकर जमीन बेकायदेशीरपणे हडपल्याचा आरोप करत राहुल मिनानाथ तारे यांनी पत्रकार परिषदेत स्फोटक खुलासे केले. या आरोपानंतर बुलढाण्यात तापलेलं वातावरण चांगलंच ढवळून निघालं आहे.मात्र भंडारे यांनीही पलटवार करत या आरोपांना थेट राजकीय कटकारस्थानाची शिक्कामोर्तब दिली आहे. ज्या जमिनीचा व्यवहार माझ्याशी थेट संबंधीत नाही, त्यात माझं नाव ओढून नियोजित बदनामी मोहिम राबवली जातेय, असा आरोप करत त्यांनी स्पष्ट केले की डोंगरखंडाळा (ता. बुलढाणा) येथील गट क्र. १७५ मधील सदर जमीन त्यांच्या नातलगांनी कायदेशीररीत्या महेंद्र नारायण राऊत यांच्या नावावर खरेदी केली आहे. सातबारा उतारे आणि फेरफार नोंदी राऊत यांच्या नावावर असताना माझ्यावर आरोप करणे हे दुजोरा नसलेले राजकारण असल्याचे भंडारे यांनी ठणकावले. भंडारे यांचा गंभीर आरोप २ नोव्हेंबरला मंत्री शिरसाट यांच्या बुलढाणा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर माझी प्रतिमा काळवंडण्यासाठी ठरवून हा डाव रचला गेला. मीडिया ग्रुपवर ङ्ग भंडारे यांनी ४.५ कोटींची जमीन हडपलीफ असा खोटा



मजकूर छापून मला सामाजिक आणि प्रशासकीय स्तरावर बदनाम करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जर जमीन खरेदी बेकायदेशीर असेल तर कोर्टात जा! पण माझ्या नावावर चिखलफेक कराल तर मीही शांत बसणार नाही, असा संतप्त इशारा भंडारे यांनी दिला. या प्रकरणी भंडारे यांनी बुलढाणा ग्रामीण पोलिसांत तक्रार दिली असून क्रमांक ३८९/२०२५ दाखल करण्यात आला पुढील तपास ग्रामीण पोलीस करीतआहे.

# २०१२ अतिक्रमण प्रकरणात मोठा कलाटणी! सर्व आरोपी निर्दोष मुक्त सरकारचा खोटा खटला फसला




**जनसंचलन/बुलढाणा**

तब्बल १३ वर्षांपूर्वी म्हणजेच दि. २२ जून २०१२ रोजी नगरपरिषदेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान दाखल केलेल्या गुन्ह्यांमध्ये सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. प्रशासनाच्या दबावाखाली दाखल केलेल्या गुन्ह्यांचा खटला न्यायालयात टिकू शकला नाही, असा थेट संदेश या निकालातून गेला आहे. त्या दिवशी कारवाईला विरोध केल्याच्या कारणावरून रविंद्र देवीप्रसाद जैस्वाल आणि राजेंद्र देवीप्रसाद जैस्वाल यांच्यावर ३५३, ३३२, ३०९, ५०४ या गंभीर कलमान्वये गुन्हे दाखल झाले. प्रथम न्यायालयाने शिक्षा ठोठावून आरोपींना गुन्हेगार ठरवले होते. मात्र हा निर्णय आव्हानात सत्र न्यायालयात उलथवून आरोपींची पूर्णपणे निर्दोष मुक्तता करण्यात आली. फौजदारी अपील क्र. २४/२०१६ वर न्या. कोर्ट क्र. ३ यांनी दि. ०१ नोव्हेंबर २०२५ रोजी निकाल देत सरकारचा खटला फोल ठरवला. अॅड. अजय दिनोदे आणि अॅड. प्रवीण वाघमारे यांच्या तडाखेबाज युक्तिवादासह अॅड. रोहित दिनोदे, अॅड. अबुझर अन्सारी आणि अॅड. प्रियेश चौधरी यांचे मोलाचे सहकार्य ठरले. न्यायालयाच्या या निर्णयाने प्रशासनाच्या मनमानी कारवाईवर मोठा चाप बसल्याचे स्पष्ट झाले आहे. आता खोट्या गुन्हेगारी कारवाईला जबाबदार कोण याचा हिशेब मागण्याचीवेळआलीआहे!

# केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश....



**जनसंचलन/बुलडाणा**

लोणार तालुक्यातील सुलतानपुर येथे योग आणि निसर्गोपचार संशोधन परिषदेच्या अत्याधुनिक १०० खाटांच्या रुग्णालयास २५ एकर जमिन देण्याचा निर्णय महसुल व वनविभाग मंत्रालयाने घेतला आहे. त्या संदर्भातील शासन निर्णय ४ नोव्हेंबरला निर्गमित झाला असुन या निसर्गोपचार रुग्णालयाचा मार्ग सुकर झाला आहे. केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्यसरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत केले आहे.

बुलढाणा जिल्हयातील लोणार या जगप्रसिध्द पर्यटन स्थळी योग आणि निसर्गोपचार रुग्णालय उभारल्या गेले पाहिजे या दृष्टीकोनातुन योग आणि निसर्गोपचार संशोधन संस्थेमार्फत केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाकडे मागणी करण्यात आली होती. दरम्यान हे योग आणि निसर्गोपचार रुग्णालय उभारणीसाठी राज्याच्या महसुल आणि वनविभागाकडे लोणार तालुक्यातील सुलतानपुर येथील गट नं.८८५ क्षेत्रातील २५ एकर जमिन देण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्यशासनाकडे बुलढाणा जिल्हा प्रशासनाच्या वतीने पाठविण्यात आला होता. त्यानंतर केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्यशासनाच्या महसुल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांची भेट घेऊन सदरहु जमिन योग व निसर्गोपचार रुग्णालयाला विनामुल्य देण्यासंदर्भात चर्चा केली होती. जागतीक दर्जाच्या लोणार सरोवर परिसरामध्ये हे रुग्णालय उभारल्या गेल्यास त्याचा फायदा सर्वसामान्य जनतेला होईल हेही त्यांच्या निदर्शनास आणुन दिल्यानंतर या रुग्णालयाला जमिन देण्यासंदर्भातील सकारात्मकता राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांना भेटीदरम्यान दर्शविली होती. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी महसुल व वनविभाग मंत्रालयाच्या वतीने शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असुन यामध्ये बुलढाणा जिल्हयातील लोणार तालुक्यातील मौजे सुलतानपुर येथील शासकिय गट नं.८८५ एकुण क्षेत्रातील २९.६२ हेक्टर आर जमिनीपैकी २५ एकर जागा केंद्रिय योग आणि निसर्गोपचार संशोधन परिषदेच्या अत्याधुनिक १०० खाटांच्या रुग्णालय स्थापनेस (उभारण्यास) विनामुल्य जागा देण्याससंदर्भातील निर्णय सहाय्यक सचिव ज्ञा.ल.सुळ यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झाला आहे. त्यामुळे आता सुलतानपुर येथे उभारण्यात येणाऱ्या योग निसर्गोपचार रुग्णालय उभारणीला गती मिळणार असुन राज्यशासनाने जमिन उपलब्ध करुन दिल्याबद्दल केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्य शासनाचे आभार व्यक्त केले आहे

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनेल
वेब साईड & पोर्टल चॅनेल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भीड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001